॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने दि. १८ ते २६ फेब्रुवारी या कालावधीत पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ क्रिकेट (पुरूष) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून तीन राज्यातील ६२ संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्र, गुजरात व गोवा या तीन राज्यातील ६२ क्रिकेट संघ सहभागी होतील. विद्यापीठ, मुळजी जेठा महाविद्यालयाचे मैदान, सावखेडा शिवारातील महेंद्र कोठारी स्पोर्टस् अकादमीचे मैदान आणि अनुभुती शाळेचे मैदान अशा चार मैदानांवर या स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धांच्या नियोजनासाठी विविध २२ समित्या कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी गठीत केल्या असून कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची बैठक घेण्यात आली व त्यामध्ये स्पर्धेच्या आयोजनावर सविस्तर चर्चा झाली.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. ६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिकशास्त्र प्रशाळेत दि. १६ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख संचालनालयाच्यावतीने एक दिवसीय मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात येणार आहे.

शासनाच्या पुरातन विभागाचे तज्ज्ञ या कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, शासकीय व निमशासकीय अधिकारी-कर्मचारी यांना ही कार्यशाळा उपयुक्त राहणार असून नोंदणी शुल्क रूपये २०० आकारण्यात येणार आहे. इच्छुकांनी डॉ. मनोज इंगोले ( मो. क्र.9623627758) व कुणाल महाजन (7397984672) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. अजय पाटील यांनी केले आहे.

………………………………………………………………………………………………………………..

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ६ फेब्रुवारी, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी